नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 22/05/2020 (शुक्रवार)
(दुपार)

## कपासाची प्रतिबंधीत बीटी बियाणे पकडली
## स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही
## 02 आरोपींसह एकुण 21,38,000/– रू चा मुद्देमाल जप्त

दिनांक 20.05.2020 रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण चे पथक नागपूर उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना पोलीस मित्राद्वारे खात्रीशिर माहिती मिळाली की, पोस्टे बुट्टीबोरी चे हद्दीत दुधा शिवारात सोयाबिन ऑईल कंपनीच्या मागे एक मालवाहु बोलेरो पिकअप गाडी कमांक एमएच 40 बीजी 1566 वाहन व माल घेणारे ब्रिझा असे वाहन येणार आहे व त्यांच्यात कपाशीच्या प्रतिबंधीत बीटी बियाण्यांची तस्करी होणार आहे. या खबरेवरून त्याठिकाणी रेड केला असता ब्रिझा गाडी क. एमएच 40 बीई 3179 कमांकाच्या गाडीमध्ये प्रतिबंधीत कपाशीच्या बियाणांची 12 पोते मिळुण आली. चौकशी दरम्यान कपाशीच्या प्रतिबंधीत बीटी बियाणे असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे ब्रिझा गाडी कमांकाचा मालक सुनिल श्यामराव राऊत वय 31वर्षे, रा. चिखलापार आणि गाडी चालक विठ्ठल राजु ढोके रा. पांजरापार दोन्ही ता. भिवापूर यांना ताब्यात घेवुन त्यांच्या ताब्यातुन कपाशीच्या प्रतिबंधीत बीटी बियाण्यांचे 12 पोते जप्त केली ज्यामध्ये 4,38,000 किंमती बियाणाचे 600 पॉकिट आणि 9,00,000/– रू. किमतीची ब्रिझा गाडी जप्त करण्यात आली. तसेच घटनास्थळावरून बोलेरो पिकअप गाडी कमांक एमएच 40 बीजी 1566 वाहन कि. 8,00,000/– रू. असा एकुण 21,38,000/– रू चा माल जप्त करण्यात आला. खरेदी करणारे आरोपी 1) सुनिल श्यामराव राऊत वय 31वर्षे, रा. चिखलापार आणि 2) गाडी चालक विठ्ठल राजु ढोके रा. पांजरापार दोन्ही ता. भिवापूर व 3) माल पुरवठा करणारा पळुन गेलेला आरोपी नामे मंगेश वासुदेव वानखेडे रा. हनुमान नगर वरोरा जिल्हा चंद्रपुर हा असुन आरोपीतांविरूध्द पोस्टे बोरी येथे अप.क्र. 333/2020 कलम 406, 420, 468, 471, 34 भादवी सहकलम 7 बियाणे कायदा 1966, बियाणे नियंत्रण आदेश 1983 खंड 8 (अ) नियम क्र. 7, 8, 9, 10, 11, 12, 13, 14 बियाणे नियम 1968, कलम 12, 13, 14 महा कापुस बियाणे कायदा 2009, नियम क्र. 10 कापुस बियाणे नियम 2010 व कलम 7, 15पर्यावरण संरक्षण कायद्यान्वये गुन्हा नोंद करून आरोपी क. 1 व 2 यांना अटक करण्यात आली असुन पुढील कार्यवाहीकरीता पोस्टे बुटटीबोरी यांचे ताब्यात देण्यात आले. व आरोपी क. 3 याचा शोध घेण्यात येत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती मोनिका राऊत तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे मार्गदर्शनात पोउपनि

सचिन मत्ते सहा. फौजदार बाबा केचे, पोलीस हवालदार चंद्रशेखर गडेकर, गजेंद्र चौधरी, महेश जाधव, नायक पोलीस शिपाई सुरेश गाते, दिनेश आधापुरे, पोलीस शिपाई रोहण डाखोरे आणि चालक पोलीस हवालदार भाऊराव खंडाते श्री एस.जे. पवार, तंत्र अधिकारी, श्री मनोज केचे, विभागीय गुण नियंत्रक निरीक्षक, कृषी विभाग, नागपूर, श्री एस. के. पवार, कृषी अधिकारी, पंचायत समिती नागपूर यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर